# प्रकरण २ रे

## संदर्भांकित विषयाच्या अनुरोधाने आजवर झालेली संशोधने.

१) प्रास्ताविक

२) आजवर झालेली संशोधने.

# प्रकरण २ रे

## संदर्भांकित विषयाच्या अनुरोधाने आजवर झालेली संशोधने व साहित्य.

## २.१ प्रास्ताविक -

संशोधनाची पूर्वतयारी म्हणून संशोधकाने संशोधनासाठी निवडलेल्या क्षेत्रामध्ये पूर्वी झालेल्या संशोधनाचा व संबंधीत साहित्याचा अभ्यास करणे आवश्यक असते. त्यानुसार महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील हिंदी या विषयासंबंधी संशोधन विभागातील उच्च संशोधन पदवी धारण केलेल्या संशोधकाच्या संशोधनाचा तसेच संबंधीत विषयास उपयुक्त वाटलेल्या प्रकाशित साहित्याचा प्रस्तुत संशोधकाने अभ्यास केला व आवश्यक ते संदर्भग्रंथ अभ्यासले. तसेच भारतातील शिक्षण विषयक संशोधनाचा सम्यक रितीने विचार करून ही संशोधने अभ्यासकाना उपयुक्त व्हावीत म्हणून डॉ. एम. बी. बुच यानी आजवर तीन मोठया संशोधन ग्रंथाचे संकलन व संपादन केले आहे. त्यामध्ये शिक्षण क्षेत्रात झालेल्या विविध विषयावरील संशोधनाचा समावेश झालेला आहे. प्रस्तुत संशोधकाने डॉ. बुच यानी संपादन केलेले दोन ग्रंथ अभ्यासले आहेत. या अभ्यासातून संशोधकाला त्यानी निवडलेल्या विषयाचे कोणत्या पध्दतीने संशोधन करावयास हवे याचे असे ज्ञान झाले तसेच या संशोधकाच्या निष्कर्षांचा पडताळा पाहण्यासाठी उपयोग झाला.

## २.२ आजवर झालेली संशोधने -

हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणून स्विकारल्यानंतर हिंदी भाषेच्या अध्ययन अध्यापनाचा खालील संशोधकांनी आपल्या संशोधनासाठी अभ्यास केल्याचे निदर्शनास आले. ही संशोधने इ.स. १९६४ पासून आजवर झालेली आहेत. म्हणजे गेल्या २४ वर्षातील हिंदी विषयांतर्गत झालेल्या संशोधनाचा

प्रस्तुत संशोधकाने अभ्यास केला आहे. या अभ्यासातील कांही ठळक संशोधने व त्यांचे निष्कर्ष प्रस्तुत विषयास पूरक असल्याने त्याचा आढावा घेण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

(१) डॉ. पटेल जे.एम. यांनी हिंदी, इतिहास आणि भूगोल या विषयासाठी इयत्ता ८ वी करिता महाराष्ट्र राज्यासाठी मानदंड ठरविणाऱ्या स्नातक स्थरावरील प्रबंध इ.स. १९७७ मध्ये मुंबई विद्यापीठास सादर केला होता. या प्रबंधातून त्यानी खालील निष्कर्ष काढले.

निष्कर्ष –

१) वरील विषयामधील केवळ ५०% आशयाची संपादणूक विद्यार्थ्यांकडून होते असे आढळले.

२) शहरी भागातील मुलांमध्ये आणि मुलींमध्ये संपादणूकीमधील फरक लक्षात घेण्यासारखा नव्हता.

३) शहरी भागातील विद्यार्थ्यांचे संपादन वरच्या दर्जाचे होते.

४) ग्रामीण भागातील मुलींची संपादणूक ग्रामीण भागातील मुलांच्या संपादणूकीपेक्षा वरच्या दर्जाची होती.

५) संपादणूक व वय यांच्यामध्ये परस्पर सहसंबंध असल्याचे आढळून आले. १

(२) डॉ. गिरी जे.पी. यांनी इयत्ता ६ वी ते ९ वी पर्यन्तच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असलेली शब्दसंपत्ती तयार करण्यासाठी इ.स. १९७६ साली मुंबई विद्यापीठाला आपला शोध प्रबंध सादर केला होता. त्यांनी वरील चार वर्गांच्या विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीचा विविध बाजूनी विचार करून विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती कशी वाढवता येईल याचा अभ्यास केला सदर प्रबंधातील निष्कर्षावरून अहिंदी प्रदेशातील हिंदी विषयाच्या अध्यापनासाठी इयत्ता ८ वीच्या वर्गात अध्यापन करीत असताना शिक्षकांना मातृभाषेचा वापर का करावा लागतो याची कारणे शोधण्यास मदत झाली. २

(३) डॉ. वर्मा पी. यानी इ.स. १९७७ मध्ये इयत्ता ६ वी व ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी हिंदी भाषेच्या यशासाठी मानदंड ठरविणाऱ्या बाबीचा अभ्यास केला. त्यानीही आपला शोध प्रबंध मुंबई विद्यापीठाला सादर केला. ३

(४) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाने १९६४ मध्ये पुणे जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील इंग्रजी व हिंदी या विषयांच्या अध्यापनाच्या सद्य:स्थितीबाबतचे सर्वेक्षण केले आहे. सदर संशोधनामध्ये मंडळाने जवळजवळ ५० पेक्षा अधिक मुख्याध्यापकानी या विषयाबाबतच्या मांडलेल्या महत्वाच्या सूचना सदर संशोधनातून खालील प्रमाणे दिसून आल्या.

१) विषयाचे अध्यापन अनुभवी व प्रशिक्षीत शिक्षकांच्याकडे सोपवावे.

२) भाषा अध्यापनात व्याकरण, आकलन आणि लेखी काम यावर अधिक भर दिला जावा.

३) हिंदी विषयाचे अध्यापन करण्यासाठी अनुभवी व प्रशिक्षीतच शिक्षकांची निवड करण्यात यावी.

४) पाठ्यपुस्तकांचे संपादन करताना श्रेणीबध्द योजनेचा विचार करावा.

५) संपादन व वेगवेगळ्या वर्गासाठी मंजूरी देताना श्रेणीबध्द रचनेचा विचार करावा.

६) विद्यार्थ्यांना पूरक वाचनासाठी प्रोत्साहन देण्यात यावे त्यासाठी उपयुक्त असणाऱ्या पुस्तकांची शिफारस करावी. सदर अहवालाने असेही स्पष्ट केले आहे की हिंदी अध्यापनात जिवंतपणा आणण्यासाठी वातावरण, शिक्षक, शैक्षणिक साधने, पाठ्यपुस्तके, पूरक वाचन इ. भाषा विषयांच्या अध्ययनास उपयुक्त असणाऱ्या सर्व बाबीकडे विशेष लक्ष देण्यात यावे. ४

(५) महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ औरंगाबाद विभागानेही माध्यमिक शाळातील हिंदी विषयाच्या अध्यापनाच्या सद्य:स्थितीचे सर्वेक्षण केले आहे. सदर सर्वेक्षणाचा अहवाल इ.स. १९६६ साली प्रसिध्द करण्यात आला

होता. या अहवालात खालील प्रमुख सूचना मंडळाने केल्या आहेत.

१) माध्यमिक शाळेत हिंदी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकासाठी परिसंवाद, उजळणीवर्ग, कृतिसत्रे आणि प्रशिक्षणवर्ग आयोजित करावेत.

२) भाषेच्या अध्यापनासाठी योग्य आणि बिनचूक अध्यापन पध्दतीचा उपयोग करण्यात यावा. इतर शिफारसी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यानी केलेल्या सर्वेक्षणाप्रमाणेच आहेत. ५

(६) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण मंडळ दिल्ली यांच्या शिक्षण विभागामार्फत इ.स. १९७४ मध्ये हिंदी वाचन व लेखन यासाठी देवनागरी लिपीच्या उपयुक्ततेचे पृथ:करण केले आहे व यामधून मंडळाने हिंदी वर्णमालेसाठी व विराम चिन्हासाठी कांही भाषेच्या अक्षराच्या वळणासंबंधी कांही निष्कर्ष मांडले आहेत. त्याचप्रमाणे सदर मंडळाने असेही प्रगट केले आहे की वाचनावर लिपीचा परिणाम विशेषत्वाने होतो. ६

(७) डॉ. जैन डी.सी. यांनी हिंदी लेखनातील चुका आणि सुधारण्यासाठी करावयाचे सुधारणात्मक प्रयत्न हा शोधविषय आपल्या संशोधनासाठी घेऊन सदर शोध प्रबंध इ.स. १९७८ मध्ये आग्रा विद्यापीठाला सादर केला. डॉ. जैन यांच्या सदर शोध प्रबंधातून खालील निष्कर्ष हिंदी शिक्षकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या लेखनातील चुका कशा सुधाराव्यात हा प्रश्न सर्वच शिक्षकाना व पालकाना भेडसावतो. चुका सुधारण्यासाठी डॉ. जैन यानी सांगितलेले तंत्र म्हणजे "प्रबलीकरण चुका सुधारणा तंत्र" हे होय. या तंत्रासंबंधी डॉ. जैन यानी खालील निष्कर्ष काढले आहेत.

१) हे तंत्र व्यक्तिनिष्ठ चुकातंत्रापेक्षा उपचारात्मक अध्यापनात अधिक प्रभावी आहे.

२) उपचारात्मक अध्यापनात प्रबलीकरण चुका सुधारणा तंत्र, समूह चुका सुधारणातंत्रापेक्षा अधिक प्रभावी आहे. त्याचप्रमाणे उपचारात्मक

अध्यापनात मोठा समूह चुक सुधारणातंत्र आणि व्यक्तिनिष्ठ चुक सुधारणातंत्र सारखेच परिणामकारक आहेत.

३) हिंदी लेखनातील चुका प्रामुख्याने व्याकरण व रचना यामधील असतात आणि त्या सुधारणासाठी उपचारात्मक अध्यापनच आवश्यक आहे. असे त्यांनी प्रस्तुत संशोधनातून स्पष्ट केले आहे. शाळा शाळातून उपचारात्मक अध्यापन पध्दतीचा वापर होतो की नाही हे पाहण्यासाठी डॉ.जैन यांचा सदर संशोधनाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. ७

(८) डॉ.मिश्रा बी.जी., डॉ.राव के.व्ही., एल.एन.कौशल आणि जरावाल एस.ई. यानी दोन भाषा येणा-या विद्यार्थ्यांच्या संदर्भातील हिंदी विषयाच्या बाबतीत केलेला अभ्यास हा संशोधनाचा विषय आहे. या संशोधकाला असे आढळून आले की, एका भाषेतील व्याकरणातील वैशिष्टयाचा तसेच वाड.मयीन शैलीचा हिंदी शिकणा-या विद्यार्थ्यांच्या भाषा शैलीवर परिणाम होतो. सदर संशोधनात संशोधकाला असेही आढळून आले आहे की, हिंदी भाषेच्या विविध प्रकारात साम्य आहे आणि दक्षिण भारतातील द्विभाषी हिंदी शिकणा-यांच्या संदर्भात अडथळा निर्माण करणारे आहे. ८

(९) डॉ.सक्सेना यांनी हिंदी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील इयत्ता ८, ९ व १० वीच्या मुंबई शहरातील विद्यार्थ्यांच्या निबंध लेखनाच्या संदर्भात येणा-या अडचणींचा अभ्यास केला आहे. या अभ्यासाचा हेतू विद्यार्थ्यांची वाड.मयीन अभिव्यक्ती सुधारावी असा होता, असे संशोधकाने सूचित केले आहे. सदर प्रबंध त्याने एस.एन.डी.टी. विद्यापीठाला १९७७ मध्ये सादर केला. संशोधकाने आपल्या प्रबंधातून खालील गोष्टी स्पष्ट केल्या आहेत.

१) हिंदी भाषेच्या अभिव्यक्तीच्या समस्यांचा उगम विविध बाजूनी झालेला दिसून येतो.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

२) या विविध बाजू म्हणजे - १. शिक्षक, २. शाळा, ३. विद्यार्थी ४. अभ्यासक्रम, ५. क्रमिक पुस्तके. सदर संशोधनात संशोधकाने हिंदी अध्ययन अध्यापनाच्या विविध बाजूंचा पूर्णपणे अभ्यास केला आहे. ९

(१०) डॉ.वर्मा व्ही.पी. यांनी हिंदी अध्यापनासाठी उपयोगात आणल्या जात असलेल्या अध्यापन पध्दतींचा व साधनांचा अभ्यास अशा आशयाचा प्रबंध बिहार विद्यापीठात १९७१ साली सादर केला. प्रस्तुत शोध प्रबंधासाठी संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला व संशोधकाने असे सिध्द केले की शिक्षण प्रक्रियेमध्ये अभ्यासक्रमाला अनन्य साधारण महत्व आहे. परंतु या महत्वाच्या घटकाकडे आपल्या शिक्षण पध्दतीत योग्य प्रकारे लक्ष दिले गेले नाही. बालच्या वर्गातील हिंदी शिकणा-या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी श्रवण, निवेदन, वाचन आणि लेखन या चारही कौशल्याना विशेष प्राधान्य दिले गेले.पाहिजे असे संशोधकाने स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे सांस्कृतिक आणि सामाजिक एकात्मता साधणे हाच भाषेच्या अध्यापनाचा अंतिम हेतू असतो ही गोष्टही संशोधकाने आवर्जून मांडलेली आहे. १०

(११) सिंग आर.एल. यानी इयत्ता ८ वी ते १० वी च्या वर्गातील "हिंदी विषय शिकणा-या विद्यार्थ्यांच्या सर्वसामान्य चुकांचा एक नमुना" असा विषय घेऊन आपला शोध प्रबंध मुंबई विद्यापीठाला १९८५ मध्ये सादर केला व त्यानी या विद्यार्थ्यांच्या हिंदी विषयाच्या लेखनातील सर्वसामान्य चुकांच्या कारणांची मीमांसा केली आहे. चुका सुधारण्यासाठी उपचारात्मक कार्यासाठी काही सूचना त्यांनी केल्या आहेत. ११

वरील ११ शोध प्रबंधाचे अवलोकन प्रस्तुत संशोधकाने आपल्या विषयाच्या उपयुक्ततेसाठी केले आहे व त्यानुसार संशोधनाच्या साधनांची चिकित्सा करताना वरील सर्व संशोधनातील निष्कर्षांचा उपयोग करुन घेतला आहे. याशिवाय भारतातील निरनिराळ्या शैक्षणिक संस्था व

समित्या हिंदी प्रसार व प्रचाराचे कार्य करीत आहेत व राष्ट्रभाषेच्या प्रगतीला हातभार लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. या सर्व संस्थानी आपआपले अहवाल देखील वेळोवेळी प्रसिध्द केले आहेत. त्या संस्था खालील प्रमाणे -

१) भारतीय हिंदी परिषद, नवी दिल्ली.

२) भारतीय हिंदी परिषद, काश्मिर प्रदेश श्रीनगर.

३) हैद्राबाद हिंदी प्रचार परिषद, हैद्राबाद.

४) राष्ट्रभाषा प्रचार परिषद, भोपाळ.

५) त्रावणकोर हिंदी प्रचार सभाउ त्रिवेंद्रम.

६) मणिपूर प्रचार परिषद, इम्फाल.

७) महाराष्ट्र प्रचार समिती, पुणे.

८) बंबई राष्ट्रभाषा प्रचार सभा, बंबई. १२

या सर्व समित्याने वेळोवेळी जाहीर केलेले वार्षिक अहवाल संशोधकाने अभ्यासून अहवालातील सूचनांचा व कार्याचा आढावा घेतला आहे.

तसेच हिंदी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी निघणारी त्रैमासिके व वार्षिके यांचाही संशोधकाने अभ्यास केला आहे. ती खालील प्रमाणे होत.

१) <u>राष्ट्रभारती</u> - १९५० पासून हिंदी भाषेचा प्रचार व प्रसार व महत्व स्पष्ट करणारे हे हिंदी मासिक होय. यातून हिंदी भाषेच्या विकासाच्या दिशा व महत्व स्पष्ट करणाऱ्या हेतूने ते संपादित केले जाते.

२) <u>सर्वोदय</u> - ही एक हिंदी भाषिक पत्रिका असून आखिल भारतीय सर्व सेवा संघ, वाराणशी (उत्तर प्रदेश) द्वारा प्रसिध्द केली जाते. आंतरराष्ट्रीय सामंजस्याकरीता हिंदी भाषेचा जोमाने प्रचार कार्य करणारी ही पत्रिका होय.

३) <u>राष्ट्रवीणा</u> - हे त्रैमासिक गुजराथ राज्यातून हिंदी भाषेच्या प्रचाराचे कार्य १९५१ पासून करीत आहे. हिंदी साहित्य, काव्य, निबंध व नाटक इ. साहित्य प्रकाराचा प्रसार जनमानसापर्यन्त पोहोचवण्याचा प्रयत्न राष्ट्रवीणा करते. आलोचनात्मक दृष्टीकानातून लिहीले जाणारे त्रैमासिक म्हणून प्रसिध्द होते. हिंदी अध्यापक, प्राध्यापकाना उपयुक्त ठरणारे असे हे त्रैमासिक आहे.

तसेच राष्ट्रभाषा विचारसंग्रह, हिंदुस्थान समाचार वार्षिकी, लोकवाणी, हिंदी समाचार दर्शन, जीवन साहित्य इ. साहित्याच्या कार्याने हिंदी भाषा विकासाच्या कार्यात मोलाची भर घातली आहे. हे सर्व प्रकाशित साहित्य असून हिंदी भाषेच्या चौफेर विकासासाठी कार्य करणाऱ्या संस्था या साहित्याचे संपादन करीत आहेत. १३

प्रस्तुत संशोधकास वरील सर्व साहित्याचा उपयोग आपल्या संशोधनात झाला आहे. संशोधकाने वरील संशोधनाचा व प्रकाशित साहित्याचा उपयोग बार्शी तालुक्यातील माध्यमिक शाळांतील हिंदी भाषेच्या अध्ययन अध्यापनाचा सद्:स्थितीचा अभ्यास करण्याकरिता करून घेतला आहे.

# संदर्भ


1) Buch, M.B.(Ed.) A Second Survey of Research in Education 1972-1978.
Baroda, Society for Educational and Development
1979 P - 383

2) Ibid - P - 388

3) Ibid - P - 393

4) Ibid - P - 435

5) Ibid - P - 442

6) Ibid - P - 294

7) Ibid - P - 298

8) Ibid - P - 310

9) Buch M.B.(Ed.) A Survey of Research in Education, Baroda, M.S.University Centre of Advanced study in Education, faculty of Education and Psychology
1974 P - 211

10) Ibid - P - 227

11) Ibid - P - 390

१२) सुखीया एस.पी. मेहरोत्रा पी.वी. मेहरोत्रा आर.एन. शैक्षिक अनुसंधान के मूलतत्व विनोद पुस्तक मन्दिर, आग्रा १९८४ पृष्ठ २४

१३) गोयल शिवकुमार हिन्दुस्थान समाचार. सम्पादक, वार्षिकी १९७४. पृष्ट ३१.